MHSN060007152022

R.C.S. 100/2022
Laxman Maruti Shinde Vs. Sushila Maruti Shinde

## निशाणी ३९ वरील आदेश

**०१.** वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–६, नियम–१७ व कलम १५१ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी केला आहे.

**०२.** वादीने असे कथन केले आहे की, वादीने दावा कलम १क मध्ये वर्णन केलेल्या समाईक मिळकतीतील त्यांचा हक्क डावलून ता. २४.११.२०२१ रोजी प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी वादींना अंधारात ठेवून जो व्यवहार केला आहे. त्या मिळकतीतील आपण अविभक्त हिस्सा खरेदीदाराकडून स्वतंत्रपणे कब्जेवहिवाटीस मिळावा म्हणून हा दावा केला आहे. या दावेकामी काही त्रुटी आधारे हा दावा दाखल केला असून या त्रुटी नुकत्याच या वादीच्या निदर्शनास आल्या आहेत. या कायदेशीर बाबी कोर्टासमोर व पुराव्याच्या दृष्टीने समोर येणे आवश्यक असून तशा त्या बाबी समोर न आल्यास त्याचा गैरफायदा विरुध्द पक्षकारांना मिळणार असून त्यांनी केलेल्या बेकायदेशीर कृत्यास बळ व उभारी मिळणार आहे. सबब वादीने अर्जात नमूद केलेप्रमाणे दुरुस्ती केलेस मूळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही अगर प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे वादीने सदरचा अर्ज मंजूर करुन त्याप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादी नं. १ ते ४ तर्फे सदर अर्जास निशाणी ४० अन्वये म्हणणे दाखल केले असून आक्षेप घेतला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, वादीचा अर्ज व

त्यातील विधाने प्रतिवादीस मान्य व कबूल नाहीत. वादीला सदरचा दावा करणेचा कोणताही मूळ अधिकार नाही. त्याप्रमाणे जी दुरुस्तीची मागणी केली आहे ती योग्य होत नाही. वादीने निशाणी ५ कडे अर्ज दिलेला आहे. त्यास प्रतिवादीने म्हणणे दिले परंतु सदर अर्जावर युक्तीवाद न करता वादीने निशाणी २७ कडे स्टेटस्कोसाठी वेगळा अर्ज दिला त्यावर या प्रतिवादीने म्हणणे दिले. त्यानंतर युक्तीवाद होऊन तो अर्ज नामंजूर केला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, त्याचप्रमाणे या प्रतिवादीनी मूळ दावेस कैफियतही निशाणी २४ कडे दिलेली आहे. वादीनी जाणून बूजून प्रतिवादीस त्रास व सदरचे काम लांबणीवर जावे या हेतूने सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज दिलेला आहे. सबब प्रतिवादीने सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** प्रतिवादी नं. ५ तर्फे सदर अर्जास निशाणी ४१ अन्वये म्हणणे दाखल केले असून आक्षेप घेतला आहे. त्यांचे पुढे कथन आहे की, वादीचा अर्ज व त्यातील विधाने प्रतिवादीस मान्य व कबूल नाहीत. सदर दावेचे समन्स मिळालेनंतर प्रस्तुत प्रतिवादी हे हजर होऊन निशाणी २६ कडे कैफियत व म्हणणे दाखल केले आहे. त्यावेळी वादीने निशाणी २९ कडे अर्ज देऊन एकतर्फा ताकीदीची मागणी केली होती. मात्र सदरचा अर्ज न्यायालयाने नामंजूर केला आहे. वादीने प्रतिवादीस त्रास होणेच्या दुष्ट हेतुने सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**०५.** प्रतिवादी नं. ६ ते १८ यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल न केल्याने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणे विना चालविण्यात आला.

**०६.** वादीचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** वादीचे सदर अर्जावरुन असे दिसून येते की, वादीने सदर अर्जाद्वारे मागितलेली दुरुस्ती प्राथमिक स्तरावर आवश्यक स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादीस दावा दुरुस्तीनंतर त्याचे म्हणणे देण्याचा हक्क असल्याने, सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादीचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरची दावा दुरुस्ती मंजूर होणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील असलेला वाद संपुष्टात आणणेसाठी व न्यायदानासाठी मदत होईल. तसेच यामुळे दाव्यांची संख्या मर्यादित राहून वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असणारे मुद्दे एकत्रात निकाली करणे सोपे होईल. मात्र वादी यांनी सदरचा अर्ज दाखल करण्यास केलेला विलंब दुर्लक्षित करता येणार नाही. त्याकरीता वादीवर दंड लावणे अभिप्रेत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. वादीने दाव्यामध्ये विहीत कालावधीत दावा दुरुस्ती अर्जामध्ये नमूद केलेप्रमाणे योग्य ती नियोजीत दुरुस्ती करणेस दंडाची रक्कम रुपये १००/– प्रत्येकी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना देण्याचे अटीवर परवानगी देण्यात येते.
३. वादीने दुरुस्त वादपत्राची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादीसाठी दयावी.

ठिकाण –मिरज. (श्रीमती आर. व्ही. कांबळे)
दिनांक –०३.०१.२०२४. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, मिरज.

## **CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana | | |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist., Sangli. | | |
| Date of decision / typed | :- | 03 | 01 | 2024 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 03 | 01 | 2024 |
| Judgment/order uploaded on | :- | 04 | 01 | 2024 |